# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.९ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २४७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 9 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 247 | Pages 4 | Rate 4 Rs


## मुंबईकरांसाठी आदित्य ठाकरेंचे फडणवीसांना पत्र

**मुंबई**–मुंबईतील सेस आणि नॉन सेस इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. विशेषतः जुन्या आणि धोकादायक अवस्थेतील इमारतींच्या दुरुस्ती तसेच पुनर्विकासासाठी मुख्यमंत्री विशेष निधीतून तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. येत्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अनेक इमारतींची स्थिती गंभीर असल्याने मुंबईकरांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.आदित्य ठाकरे यांनी आपल्या पत्रात मुंबईतील उपकरप्राप्त म्हणजेच सेस इमारतींसह नॉन सेस इमारतींचाही प्रश्न गंभीर असल्याचे नमूद केले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात या इमारतींच्या पुनर्विकासासाठी कायद्यात बदल करण्यात आले होते. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने हजारो इमारतींमधील रहिवासी अजूनही निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत.

# राज्यात गुन्हेगारांना कायदा यंत्रणेचा धाक उरला नाही

## विशेष अधिवेशन बोलावून शक्ती कायदा पारित करा–आमदार रोहित पवार यांची मागणी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्यातील महिला व मुलींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्यांनी राज्यात गुन्हेगारांना यंत्रणेचा धाक राहिला नसल्याचा आरोप करत सरकारला एकदिवसीय विशेष अधिवेशन बोलावून शक्ती कायदा पारित करण्याचा सल्ला दिला आहे. महिला व मुलींवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना शिक्षा देण्यात कायदेच अडचण ठरत असतील तर कायदेच बदलले पाहिजेत, असे ते म्हणालेत.राज्यत गत काही दिवसांत महिला व मुलींवरील अत्याचाराच्या घटनांत मोठी वाढ झाली आहे. छेडछाड, लैंगिक अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार तसेच अल्पवयीन मुलींवरील गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. यामुळे विरोधकांनी सरकारवर कायद्याची भीती कमी होत चालल्याची टीका केली आहे. या प्रकरणी कठोर कारवाई, जलद न्यायप्रक्रिया आणि महिलांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबवण्याची मागणी विविध स्तरांतून होत असताना आमदार रोहित पवार यांनी उपरोक्त टीका केली आहे.**



**मुंबई । प्रतिनिधी**

रोहित पवार म्हणाले, पुण्यातील गणेशपेठ भागात एका दुकानदाराने १० वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची अत्यंत संतापजनक अशी आणखी एक घटना समोर आलीय, तर दुसरीकडं वर्ध्यातील वडनेरमध्ये ११ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार केल्याची दुर्दैव घटना घडली. यातील पिडीत चिमुकलीला अत्याचारानंतर खाजगी रुग्णालयात नेलं पण दुर्दैवाने त्या ठिकाणी डॉक्टरने देखील हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला, ही अतिशय चीड आणणारी गोष्ट आहे.

राज्यभरात वेगवेगळ्या ठिकाणी अत्याचाराच्या घटना वारंवार समोर येत असून गुन्हेगारांना कायद्याचा किंवा यंत्रणेचा कोणताही धाक उरलेला नाही हेच वारंवार घडणाऱ्या या घटनांवरून दिसून येतं. असल्या नराधमांना शिक्षा देण्यात कायदेच अडचण ठरत असतील तर कायदेच बदलले पाहिजे, अन्यथा सर्वसामान्य जनताच कायदा हातात घेतल्याशिवाय राहणार नाही. अजूनही वेळ गेलेली नाही सरकारने गांभीर्य दाखवत त्वरित एकदिवसीय अधिवेशन बोलावून शक्ती कायदा पारित करावा, असे ते म्हणाले.

# वादळाने केला थैमान : झाड कोसळून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

## वाघोदा–निंभोरा रस्त्यावर हृदयद्रावक घटना;परिसरात शोककळा

दैनिक वादळ वार्ता

**जळगाव । जितु इंगळे**

वाघोदा–निंभोरा रस्त्यावरील शनिमंदिराजवळ तसेच विजय बाजीराव पाटील यांच्या शेतालगत आज दुपारी सुमारे ४.०० ते ४.३० वाजेच्या दरम्यान आलेल्या भीषण वादळाने थैमान घालत एक दुर्दैवी घटना घडली. अचानक सुटलेल्या प्रचंड वेगाच्या वाऱ्यामुळे रस्त्याच्या कडेला उभे असलेले मोठे झाड क्षणार्धात कोसळले आणि त्याचवेळी रस्त्याने मोटारसायकलवरून जात असलेल्या युवकावर झाड पडून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या दुर्दैवी घटनेत शैलेंद्र राजेंद्र मेढे (रा. रोझोदा, ता. रावेर) यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मोटारसायकलचा क्रमांक चक १९ एछ २५१५ असा आहे. अचानक आलेल्या वादळामुळे परिसरात मोठी धावपळ उडाली होती. त्याचदरम्यान हे झाड कोसळल्याने



काही क्षणातच आनंदी वातावरणावर शोककळा पसरली.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. झाडाखाली अडकलेल्या शैलेंद्र मेढे यांना नागरिकांनी तात्काळ ग्रामीण रुग्णालय सावदा येथे उपचारासाठी हलविले तद नंतर ग्रामीण रुग्णालय सावदा येथील डॉक्टरांनी तपासणी करून युवकास मृत घोषित केले. ही बातमी गावात पसरताच संपूर्ण परिसर हळहळला असून नागरिकांकडून तीव्र दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस प्रशासन, महसूल विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाने घटनास्थळी धाव घेत पंचनामा व झाड हटविण्याची कार्यवाही सुरू केली. वादळामुळे काही काळ वाहतूकही विस्कळीत झाली होती.

अचानक आलेल्या या भीषण वादळाने एका कुटुंबाचा आधार हिरावून घेतल्याने परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांकडून मृत व्यक्तीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# केज येथे सत्यमेव जयते फार्मर कप आयोजित गटबांधणी कार्यशाळा उत्साहात संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज येथे पाणी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा उत्साहाने सुरुवात झाली आहे. मागील काही दिवसांपूर्वी शेतकरी गटाचे प्रशिक्षण पूर्ण झाले त्या सहभागी निमंत्रक शेतकऱ्यांसाठी केले ते शेतकरी गट बांधणी कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे, पर्यावरण मित्र डॉ.हनुमंत सौदागर,कृषी विभागाचे शरद घोबाळे,उमेदच्या तालुका अभियान व्यवस्थापक नंदा ओव्हाळ,प्रभाग समन्वयक राजरत्न कसबे,आश्रूबा गोरे, सोनिया चौरे आदींची उपस्थिती होती.केज तालुक्यातील शेतकरी घटना प्रेरित करून उत्पादन वाढीसाठी एकत्र येऊन गट बांधणी करणे आवश्यक आहे. कृषी विभाग कायम सोबत असल्याचे मत कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी व्यक्त केले. फार्मर कपच्या माध्यमा तून शेतकऱ्यांची समृद्धी होईल.शेतकऱ्यांच्या उन्नतीचा हा उत्तम मार्ग असल्याचे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.शेतकरी गटांना सदस्य निवड अथवा अन्य अडचणी आल्यास त्यांनी पाणी फाउंडेशन, कृषी विभाग,उमेद यांच्याशी समन्वय साधावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

गट बांधणी झालेल्या तालुक्यातील विविध शेतकरी गटांचा सन्मान यावेळी करण्यात आला. तालुक्यात महिला शेतकरी गट मोठ्या संख्येने सक्रिय झाल्याचे कार्यशाळेत दिसून आले. यावर्षीचा फार्मर कप तालुक्यात यावा यासाठी सर्वांच्या वतीने प्रयत्न करावेत असे मत यावेळी व्यक्त केले.कार्यशाळा यशस्वीतेसाठी तांत्रिक प्रशिक्षक विनोद ठोंबरे, तालुका समन्वयक सुवर्णा कांबळे आदींनी परिश्रम घेतले. कार्यशाळेस केज तालुक्यातील निमंत्रक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद विद्यालयाची विद्यार्थिनी योगेश्वरी रोकडे हिचे दहावीच्या परीक्षेत देदिप्यमान यश

## ९७.४० टक्के गुण मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा; सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या दहावीच्या निकालानुसार,अंबाजोगाई येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाची विद्यार्थिनी कु.योगेश्वरी संतोष रोकडे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. योगेश्वरीने परीक्षेत ९७.४० टक्के गुण मिळवून शाळेच्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.योगेश्वरीने मिळवलेल्या या उल्लेखनीय यशामुळे तिच्यावर आणि विद्यालयावर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.अत्यंत चिकाटीने आणि नियोजित अभ्यासाच्या जोरावर तिने हे यश संपादन केले असून, तिच्या या कामगिरीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**शिक्षक आणि पालकांकडून कौतुक**

योगेश्वरीच्या या यशा बद्दल तिचे शिक्षक, पालक,नातेवाईक आणि मित्रमंडळींकडून तिचे अभिनंदन केले जात आहे.शाळेच्या शैक्षणिक परंपरेत योगेश्वरीने मिळवलेले हे गुण अत्यंत प्रेरणादायी असल्याचे शिक्षकांनी नमूद केले.तसेच



पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत कु. योगेश्वरी रोकडे हिने मिळवलेल्या या यशामुळे तिच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे.तिच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले असून,तिच्या भावी शैक्षणिक वाटचालीस आणि उज्ज्वल भविष्या साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# काळेगाव हायस्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के ७ विद्यार्थिनींची ९० टक्क्यांहून अधिक गुणांची कमाई

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात काळेगाव येथील काळेगाव हायस्कूलने आपल्या यशाची परंपरा कायम राखत १०० टक्के निकाल लावला आहे. विशेष म्हणजे, विद्यालयातील ७ विद्यार्थिनींनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवून सुवर्णयश संपादन केले आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांची यशोगाथा विद्यालयाच्या निकालात विद्यार्थिनींनी बाजी मारली असून, प्रथम तीन क्रमांकाचे मानकरी पुढील प्रमाणे आहेत.प्रथम क्रमांक कु. आगे वेदिका गजानन ९३.४०%,द्वितीय क्रमांक कु.कोठावळे पुजा दत्तात्रय ९२.६०%,तृतीय क्रमांक कु.कोठावळे वेदिका संतोष ९२.००% आणि कु.गिराम वैष्णवी शिवलिंग ९२.००% या व्यतिरिक्त कु.राऊत श्रद्धा शिवदास९१.६०%, कु.सुकाळे अनुष्का सतीश ९१.२०% आणि कु.तुपारे श्रावणी भागवत ९०.००% यांनी देखील नव्वदीचा



टप्पा ओलांडला आहे. विद्यालयातील एकूण १६ विद्यार्थी ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

**सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव**

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सखाहारी तात्या गदळे, सचिव जयदत्त गदळे, संस्थेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांची मेहनत आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच शाळेने १०० टक्के निकालाचा टप्पा गाठला आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे, असे मत प्राचार्य राहुल भैय्या गदळे यांनी व्यक्त केले.या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून,त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# अलिबागमध्ये सहजानंद आध्यात्मिक गोपाळ निवास वृद्धाश्रमाचे भव्य उद्धाटन

दैनिक वादळ वार्ता

**रोहा । प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मानी या गावात सहजानंद आध्यात्मिक गोपाळ निवास या ज्येष्ठ नागरिकांसाठी उभारण्यात आलेल्या वृद्धाश्रमाचे भव्य उद्धाटन ३ मे २०२६ रोजी उत्साहात पार पडले. उज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम साकारण्यात आला आहे.या वृद्धाश्रमाचे उद्धाटन मा.आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला अलिबाग नगरसेवक प्रशांत नाईक, चनेरा–बिरवाडी (रोहा) येथील माजी सरपंच आत्माराम कासार, देहदान संस्था अध्यक्ष गिरीश तुळपुळे, राजिप समन्वयक जयवंत गायकवाड, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन सदस्य जयंत नाईक, खंडाळे सरपंच नशिकेत कावजी, परहूर सरपंच प्रफुल पाटील, मानी–भुते सरपंच अस्मिता म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.तसेच डॉ. राहुल शर्मा, डॉ. अनिल डोंगरे, डॉ. तिवारी, डॉ. साबू, आम्ही अलिबागकर ग्रुपचे आमरेश व अश्विन शिंदे, अँटी करप्शन ग्रुपचे सदस्य, लायन्स क्लब अलिबाग व मांडवा सदस्य, अँटी करप्शन ऑफ इंडिया, संस्था सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## सौर ऊर्जा निर्मितीचा वेग आणि ग्रीडची कसोटी



भारत आज स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेकडे मोठ्या वेगाने वाटचाल करत आहे, केंद्र सरकारने जागतिक स्तरावर पर्यावरण बदलासाठी २०३० पर्यंत ५०० गिगावॅट नॉन-फॉसिल ऊर्जा क्षमता उभारण्याचे ध्येय जाहीर केले आहे. सौरऊर्जा ही या परिवर्तनाचा मुख्य आधार बनली आहे. मार्च २०२६ पर्यंत भारतात सुमारे १५० गिगावॅट सौरऊर्जा क्षमता उभारली गेली आहे.ही प्रगती नक्कीच जागतिक स्तरावर अभिमानाची आहे, पण त्यातून एक अति महत्त्वाचा प्रश्न समोर येतो तो म्हणजे सौरऊर्जा वाढवून आपल्या भारताची वीज व्यवस्था स्थिर विश्वासार्ह आणि चोवीस तास अविरत किफायतशीर पद्धतीने चालू राहील का? याला उत्तर आहे सध्याच्या परिस्थितीत पर्याय सोपा नाही आणि आपल्याकडे असलेल्या उपलब्ध तंत्रज्ञानात स्वस्त तर नक्कीच नाही.सौरऊर्जा उत्तम पर्याय आहे, पण ही ऊर्जा सतत उपलब्ध नाही. सौरऊर्जा उत्पादन फक्त सूर्यप्रकाशातच होते. साधारणपणे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत उत्पादन जास्त असते, तसेच ढगाळ आणि पावसाच्या वातावरणात कमी, सर्वसाधारणपणे भारतात विजेची मागणी सर्वाधिक केव्हा असते? सकाळी कामकाज सुरू होताना, संध्याकाळी आणि रात्री सर्वात जास्त विजेची मागणी असते, म्हणजेच सौर ऊर्जेमार्फत दिवसा वीज जास्त तयार होते, पण ग्राहकांची मागणी मात्र रात्री जास्त असते. यामुळे जर आपण पूर्णपणे सौर ऊर्जेवर अवलंबून असू तेव्हा 'दिवसाची अतिरिक्त वीज'आणि 'रात्रीची कमतरता' अशी परिस्थिती निर्माण होते. मग सध्या रात्री वीज कोण पुरवते, तर कोळसा आधारित वीज प्रकल्प जलविद्युत प्रकल्प, गॅस आणि डिझेल आधारित प्रकल्प, अणुऊर्जा प्रकल्प, आजही भारतातील बहुतेक वीजपुरवठ्यावरील स्त्रोतांवर आधारित आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, भारताच्या स्थापित ऊर्जा क्षमतेमध्ये कोळसा व इतर प्रकल्पांचा वाटा सुमारे ४३% असला तरी ते अजूनही देशाच्या ७०% पेक्षा जास्त वीज निर्मिती करतात, कारण ते सतत चालू ठेवता येतात. याचाच अर्थ असा की सौरऊर्जा वाढली की, ग्रीडचे प्रमाण बिघडून उपलब्धतेनुसार ग्रीडवर ताण येतो.ग्रीडमध्ये सौरऊर्जा जास्त प्रमाणात आल्यावर, दिवसा, पारंपरिक वीज प्रकल्पांची गरज कमी होते व संध्याकाळी, सूर्यास्त होताच सौरऊर्जा पूर्णपणे बंद होते, मग ग्रीडला काही मिनिटांत मोठ्या प्रमाणावर इतर प्रकल्प सुरू करावे लागतात. यालाच तांत्रिक भाषेत Duck Curve म्हणतात. डक कर्व्ह म्हणजे असा आलेख (ग्राफ) ज्यामध्ये दुपारच्या वेळी सौरऊर्जेचे उत्पादन खूप जास्त असल्यामुळे ग्रीडवरील निव्वळ मागणी कमी होते, त्यामुळे आलेखात पोटासारखा खोल भाग दिसतो आणि सूर्यास्तानंतर सौरऊर्जा अचानक कमी झाल्यावर संध्याकाळच्या वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी इतर स्त्रोतांकडून झपाट्याने वीज पुरवठा वाढवावा लागतो, त्यामुळे ह्याच आलेखात मानेसारखा तीव्र उंचावलेला भाग दिसतो.याच कारणास्तव सौरऊर्जेवर चार्जेस लावले जात आहेत, कारण सौरऊर्जा कमी खर्चात पारेषित करण्यासाठी ग्रीड सप्लाय सतत चालू असावा लागतो, म्हणून अनेक राज्यांमध्ये सौरऊर्जेवर पुढील अतिरिक्त शुल्क आकारले जात आहेत, बँकिंग चॅर्जेस, व्हीलिंग चार्जेस, क्रॉस सबसिडी अधिभार, अतिरिक्त अधिभार, ग्रिड सपोर्ट चार्जेस, वीज वहन शुल्क त्यामुळेच सामान्य नागरिकांना प्रश्न पडतो, सरकार सौरऊर्जा प्रोत्साहन देते, मग हे चार्जेस का? यामागचे मुख्य कारण म्हणजे, वीज वितरण यंत्रणा (DISCOM²) आणि ग्रीड प्रणाली अजून विकेंद्रित सोलर मोठ्या प्रमाणात हाताळण्यास पूर्ण सक्षम नाही. याचा अर्थ, समस्या सौरऊर्जेमध्ये नाही तर ही समस्या ग्रीड व्यवस्थेच्या तांत्रिक आणि आर्थिक समायोजनात आहे.

# दादरच्या 'सुपरबॉय'ची सुवर्ण भरारी! स्केटिंग ट्रॅकवर वाऱ्याच्या वेगाने धावत रचला विजयाचा विक्रम

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मैदानावर वेगाचा थरार, जिद्द आणि कमालीचे संतुलन यांच्या जोरावर दादरच्या एका चिमुकल्या खेळाडूने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. आयईएस (खएड) ओरियन स्कूलचा अवघ्या १० वर्षांखालील गटातील खेळाडू दर्श सुराणा याने रोलर थलेटिक्स मिनी स्टेट चॅम्पियनशिप २०२५-२६ मध्ये प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारत दोन सुवर्णपदकांवर आपले नाव कोरले आहे. खोपोली येथे पार पडलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत दर्शने आपल्या वेगवान कौशल्याचे दर्शन घडवले. त्याने ४०० मीटर आणि ८०० मीटर अशा दोन्ही आव्हानात्मक शर्यतींमध्ये प्रथम क्रमांक पटकावून 'डबल गोल्ड' मिळवण्याचा मान मिळवला. रोलर थलेटिक्स हा इनलाइन स्केटिंगमधील अत्यंत कठीण प्रकार मानला जातो, जिथे केवळ वेग असून चालत नाही तर शेवटच्या क्षणापर्यंत टिकणारी सहनशक्ती आणि शरीराचा तोल सांभाळणे महत्त्वाचे असते. दर्शने या दोन्ही आघाड्यांवर आपली छाप पाडत सुवर्ण भरारी घेतली. रोलर थलेटिक्स असोसिएशन (महाराष्ट्र) आणि रोलर थलेटिक्स फेडरेशन (इंडिया) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली ही चॅम्पियनशिप राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंसाठी सर्वात महत्त्वाचे व्यासपीठ मानली जाते. या यशाने दर्शने केवळ आपल्या शाळेचेच नव्हे तर प्रशिक्षक आणि पालकांचे नावही उज्ज्वल केले आहे. त्याच्या या कामगिरीमुळे क्रीडा क्षेत्रातून त्याचे कौतुक होत असून, भविष्यातील एक मोठा ऑलिम्पिक आशास्थान म्हणून त्याच्याकडे पाहिले जात आहे.




# प्रा.श्याम मानव यांचे 'बुवा तेथे बाया' या विषयावर व्याख्यान

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

लोक बुवा, बुवा बाबांकडे का जातात? बाबा स्त्रियांना कसे फसवतात ? या संदर्भात जनप्रबोधन करण्यासाठी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय संस्थापक, संघटक प्रा. श्याम मानव यांचे व्याख्यान येत्या मंगळवारी १२ 'मे' २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता, राजर्षी शाहू महाराज सभागृह दादर येथे अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आयोजित केले आहे. यावेळी जेष्ठ संपादक ज्ञानेश महाराव,माजी पोलिस महासंचालक सुधाकर सुराडकर उपस्थित राहणार आहेत.अशी माहिती अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने प्रसिद्धी पत्रकार दिली आहे.
अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती गेली ४४ वर्ष विविध माध्यमातून जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे कार्य करीत आहे.महाराष्ट्र सरकारने २०१३ मध्ये जादूटोणा विरोधी कायदा संमत केला. पण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे अशोक खरात सारखे बाबा महाराष्ट्रात निर्माण होत आहेत, धीरेंद्र शास्त्री समाजामध्ये अनेक अवैज्ञानिक दावे करतात. अशा बाबांना अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने ४० लाखाचं आव्हान दिलेले आहे. बाबा आव्हानातून पळ कसे काढतात? लोक बुवा बाबा कडे का जातात? असे बाबा स्त्रियांना कसे फसवितात या करीता जनप्रबोधन करण्यासाठी अ भा अंधश्रद्धा निर्मूलन समितीने बुवा तेथे बाया या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.यावेळी ज्येष्ठ संपादक ज्ञानेश महाराव व माजी पोलीस महासंचालक सुधाकर सुराडकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर व्याख्यान होणार आहे.अशी माहिती अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संघटक चंद्रकांत सर्वगोड यांनी दिली आहे. या प्रबोधनात्मक व्याख्यानास सुजान नागरीकांनी अवश्य उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे युवानेते जय अजितदादा पवार यांच्या पहिल्याच जनता दरबाराला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रत्येक गुरुवारी जय पवार यांचा बारामतीत जनता दरबार



दैनिक वादळ वार्ता
**बारामती। प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवानेते जय अजितदादा पवार यांनी आजपासून बारामती येथे जनता दरबाराची सुरुवात केली असून पहिल्याच जनता दरबाराला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे चित्र पहायला मिळाले. दरम्यान जनतेच्या अडचणी, समस्या जाणून घेत जय पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ दूरध्वनीद्वारे सूचना देत अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लावण्याचा प्रयत्न केला . बारामतीतील जनतेच्या समस्या जलदगतीने सोडवण्यासाठी दर आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी जय अजितदादा पवार जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांना भेटणार आहेत.

# भगत साहेब दूरदृष्टीचे नेते-महेंद्रशेठ घरत

## शेलघर येथे भगत साहेबांची पुण्यतिथी साजरी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

दिवंगत जनार्दन आत्माराम भगत साहेब हे दूरदृष्टीचे नेते होते. गव्हाण हायस्कूल आणि कोपर फाट्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. न्हावा यार्ड नोकर भरतीत त्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरली, परिस्थितीनुरूप त्यांना रोषाला सामोरे जावे लागले, परंतु स्थानिक तरुणांना नोकर भरतीत त्यांनी प्राधान्य दिले. १९८४ च्या गौरवशाली आणि ऐतिहासिक शेतकऱ्यांच्या आंदोलनात भगत साहेबांनी मोलाची भूमिका निभावली, त्यांचे जावई रामशेठ ठाकूर यांनी त्यांचा वारसा आजपर्यंत चालवला आहे. त्यांच्यामुळे शेलघरला वलय प्राप्त झाले. राजकारणातील सर्वच नेते भगत साहेबांच्या कामामुळे शेलघरला येत असत. मीही शेलघरचाच असल्याने मला भगत साहेबांचा सार्थ अभिमान आहे. भगत साहेबांनी अखेरपर्यंत खूप संघर्ष केला, माझ्या जडणघडणीत भगत साहेबांचा हात आहे. त्यामुळे त्यांचा मी ऋणी आहे. तत्वांशी आयुष्य जगलेल्या भगत साहेबांना आज अभिवादन करणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत दिवंगत ज. आ. भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त शेलघर येथे बोलत होते. गुरुवारी त्यांच्या निवासस्थानी ३८ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी भगत साहेबांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.
यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, परेश ठाकूर, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, भाऊशेठ पाटील, भगत साहेबांचे कुटुंबीय आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनीही भगत साहेबांना आदरांजली वाहिली.



# डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून कर्जत येथे उप जिल्हा रुग्णालयास ४० लाख रुपये किमतीचे औषधे,उपकरणे व कार्यालयीन साहित्याचे वाटप

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉक्टर श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या वतीने सोमवार दिनांक ५ मे २०२६ रोजी रॉयल गार्डन मंगल कार्यालय, कर्जत येथे उप जिल्हा रुग्णालय यांना प्रतिष्ठानकडून ४० लाख रुपये किमतीचे औषधे , उपकरणे व कार्यालयीन साहित्य याचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यासाठी उपविभागीय अधिकारी श्री . प्रकाश संकपाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड , सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनाने व उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय म्हस्कर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.
प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन, श्री गणेश प्रतिमा पूजन व श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूजन करण्यात आले. उपस्थित प्रमुख पाहुणे यांचे स्वागत श्रीधर बुंधाटे , भगवान भोसले , अशोक भागीत व अमोल मानकामे यांचे हस्ते करण्यात आले.




श्री विकास चित्ते यांनी आपल्या प्रास्ताविकात डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या कार्याचा आढावा घेतला . त्यानंतर प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्रात व जगभरात करण्यात आलेली सामाजिक कामे यांची माहिती उपस्थितांना करून दिली. यामध्ये वृक्षारोपण ,आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, श्रवण यंत्र वाटप ,विविध सरकारी दाखले वाटप, बस थांबे, पाणपोई, स्मशानभूमी पुननिर्माण, उद्योजकता व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिर, कुरण व्यवस्थापन ,स्वच्छता अभियान, धरण नदी व तलावातील गाळ स्वच्छता, सर्व धर्मीय स्मशानभूमी स्वच्छता , निर्माल्या पासून खत निर्मिती, जल पुनर्भरण, शैक्षणिक साहित्य वाटप, पोलिसांना साहित्य वाटप, नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत तसेच कोरोना कालावधीमध्ये प्रंतप्रधान नागरी सहाय्य साठी दिलेले ७ लाख रुपये , मुख्यमंत्री सहायता निधीसाठी दिलेले ७ लाख रुपये तसेच रायगड जिल्हा आपत्ती प्रतिसाद निधीसाठी ५ लाख अशी एकूण ३७ लाख रुपयांची केलेली मदत उपस्थितांना अवगत करून दिली. त्याचप्रमाणे रायगड जिल्हा पोलीस कल्याण निधी करता २२-२३ या वर्षांमध्ये ७ लाख व २३-२४ या वर्षांमध्ये ५ लाख रुपयांची केलेली मदत प्रमुख पाहुणे व उपस्थितांच्या नजरेत आणून दिली.
उपस्थित प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते प्रतिष्ठान ने दिलेले वैद्यकीय मदत पत्र वैद्यकीय अधीक्षक कर्जत विजय म्हस्कर यांच्या कडे सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात आले.
उपस्थित प्रमुख पाहुणे प्रकाश संपकाळ ,उपविभागीय अधिकारी राहुल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी ,सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. या मनोगतांमध्ये डॉक्टर श्री . नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांनी केलेली कार्य याबाबत आपले विचार व्यक्त केले व उपजिल्हा रुग्णालय कर्जत यांना दिलेले साहित्य सर्वसामान्य गोरगरीब व गरजू नागरिकांना उपयोगी पडतील व त्यांना योग्य औषधोपचार मिळतील असा विचार व्यक्त करुन पद्मश्री श्री . अप्पासाहेब धर्माधिकारी , रायगड भूषण श्री. सचिन दादा धर्माधिकारी यांचा या सामाजिक कार्यातील मोठा सहभाग असल्याचे सांगून कौतुक केले.

# संगमेश्वर-आरवली येथे अवकाळी पावसाचा धुमाकूळ; महामार्गावरील वाहनचालकांची धावपळ

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यातील आरवली परिसरात आज संध्याकाळी अचानक अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे महामार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकी वाहनचालकांची चांगलीच धांदल उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले.पावसाचा जोर वाढल्याने अनेक दुचाकीस्वारांनी सुरक्षिततेसाठी महामार्गालगत असलेल्या पेट्रोल पंपांवर आणि इतर आडोशाच्या ठिकाणी आश्रय घेतला. अचानक बदललेल्या वातावरणामुळे काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाल्याचे दिसून आले.या अवकाळी पावसामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त करण्यात येत असून, हवामानातील बदलामुळे शेतकरी वर्गही चिंतेत असल्याचे बोलले जात आहे.



# महाराष्ट्र तेलंगणा राज्याला जोडणारा वर्धा नदीवरील पूल वाहतुकीसाठी बंद

## हजारो नागरिकांचे हाल:रुग्णवाहिकेलाही नो एंट्री

दैनिक वादळ वार्ता
**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र व तेलंगणा राज्यांना जोडणारा वर्धा नदीवरील महत्त्वाचा पूल आणि राज्य महामार्ग क्रमांक ३६९ (SH-369) रस्ता खराब होत असल्याने अचानक बंद करण्यात आल्याने सीमावर्ती भागातील हजारो नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शिरपूर (तेलंगणा) पोलिस विभागाने कोणतीही अधिकृत नोटीस किंवा शासकीय आदेश न देता लोखंडी अडथळे उभारून हा मार्ग बंद केल्याचा आरोप सीमेवरील ग्रामपंचायत पोडसाने केला आहे. ग्रामपंचायत पोडसाचे सरपंच व प्रशासक देविदास सातपुते यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री यांच्याकडे तशी तक्रार सुधा दाखल केली आहे.२००८ मध्ये वर्धा नदीवर बांधण्यात आलेला हा पूल पोडसा (महाराष्ट्र) आणि वेंकटरावपेट (तेलंगणा) यांना जोडतो.या प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया कायदेशीररीत्या पूर्ण झाली असून,महाराष्ट्र शासनाने





संबंधित नुकसानभरपाईही दिली होती. गेल्या १५ वर्षांपासून हा मार्ग सार्वजनिक वापरात आहे.
मात्र अलीकडे अचानक हा रस्ता बंद करण्यात आल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.विशेषतः हैदराबादकडे जाणाऱ्या रुग्णवाहिकांसाठी हा प्रमुख मार्ग असल्याने वैद्यकीय आपत्कालीन सेवांवर गंभीर परिणाम होत असून रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.तसेच शेतकरी व व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे,कारण हा मार्ग छत्तीसगड,मध्यप्रदेश व महाराष्ट्राला दक्षिण भारताशी जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे.ग्रामपंचायतीने या कारवाईला संविधानातील कलम १९(१)(व) नुसार मिळालेल्या हालचालीच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे.संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निर्देश देऊन अडथळे हटवावेत आणि SH-369 वरील वाहतूक त्वरित पूर्ववत करावी अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.दरम्यान,या मुद्द्यावर सीमावर्ती भागात संतापाची लाट उसळली असून,लवकरात लवकर मार्ग सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

> **“ महाराष्ट्र तेलंगणाला जोडणारा पोडसा रस्ता बंद झाल्याने सीमाभागातील सामान्य जनतेचे जगणे अक्षरशः विस्कळीत झाले आहे.रोजंदारीसाठी तेलंगणात जाणाऱ्या मजुरांचे हात कामाविना थांबले, तर व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प झाले आहेत. सर्वात वेदनादायक बाब म्हणजे रुग्णवाहिकाही अडवल्या जात असून, रुग्णांना जीव धोक्यात घालून शेताच्या बांधातून मार्ग काढावा लागत आहे. वेळेवर उपचार न मिळाल्यास जीवितहानीचा धोका वाढला आहे. प्रशासनाने मानवीय दृष्टीकोनातून तात्काळ निर्णय घेऊन हा मार्ग सुरू करावा.अन्यथा न्यायालयीन लढाईसोबतच मोठे जन आंदोलन रस्त्यावर उभारू.**
> **–देविदास सातपुते (प्रशासक सरपंच पोडसा)**

# नवीन कामगार संहिता नियमावलीवर हरकती व सूचना

## नोंदवण्याचे कामगार उप आयुक्तांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**अमरावती । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागामार्फत राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी नवीन कामगार संहितांच्या नियमावलीची घोषणा करण्यात आली आहे. याअंतर्गत औद्योगिक संबंध संहिता आणि वेतन संहिता यांबाबतच्या अधिसुचना दि. २८ आणि ३० एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या प्रस्तावित नियमावलीबाबत संबंधित व्यक्ती, कामगार संघटना आणि भागधारकांनी आपल्या हरकती व सूचना विहित मुदतीत नोंदवाव्यात, असे आवाहन अमरावती विभागाचे कामगार उप आयुक्त चं. अं. राऊत यांनी केले आहे.औद्योगिक संबंध संहिता आणि वेतन संहिता यांसारख्या महत्त्वाच्या नियमांबाबत हरकती नोंदवण्यासाठी ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. ज्या नागरिकांना किंवा संघटनांना या नियमावलीबाबत काही बदल सुचवायचे असतील, त्यांनी आपल्या सूचना लेखी स्वरूपात 'कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१' या पत्त्यावर पाठवाव्यात. तसेच, mh.labourcodesgmail.com या ई-मेल आयडीवर देखील आपल्या सूचना पाठवता येतील. अधिसुचना प्रसिद्ध झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत प्राप्त होणाऱ्या सूचनांचाच विचार केला जाणार असल्याने, सर्वांनी या संधीचा लाभ घेऊन आपले मत नोंदवावे, असे आवाहन कामगार विभागातर्फे करण्यात आले आहे.

# तळोधी नाईक येथे दूषित पाण्याचा प्रश्न तीव्र महिलांचा ग्रा.पं.वर मोर्चा,ताळा ठोक चा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**चिमूर । प्रतिनिधी**



तळोधी नाईक येथे गेल्या महिनाभरापासून दूषित पाणीपुरवठ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ग्रामपंचायतीकडून वारंवार कळवूनही कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने संतप्त महिलांनी आज ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढत आक्रमक भूमिका घेतली.गावातील दोन वॉर्डांत नळाद्वारे दूषित पाणी पुरवठा होत असल्याने परिस्थिती बिकट झाली आहे, तर इतर काही वॉर्डांत पाणीपुरवठाच ठप्प असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात सरपंच व ग्रामसेवक यांना वारंवार निवेदन देऊनही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.
उन्हाच्या कडाक्यात पाण्याच्या टंचाईमुळे महिलांचे हाल अधिकच वाढले असून संतप्त महिलांनी मोठ्या संख्येने एकत्र येत ग्रामपंचायत कार्यालय गाठले. यावेळी ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली आणि अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. दोन दिवसांत पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावला नाही, तर ग्रामपंचायत कार्यालयाला ताळा ठोकण्यात येईल,असा इशारा महिलांनी दिला. दूषित पाण्यामुळे आजारांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त होत असून प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# शिर्डीत महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार सोहळा दिमाखात; २७५ मान्यवरांचा सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी येथे ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी. फिल्म प्रोडक्शन, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र साई पद्मश्री पुरस्कार सोहळा २ मे २०२६ रोजी उत्साहात व भव्य स्वरूपात पार पडला. न्यू रिंग रोडवरील परिवार लॉन्स बँक्वेट हॉल येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत हा सोहळा संपन्न झाला.
महाराष्ट्र व गोवा राज्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २७५ मान्यवरांचा या प्रसंगी गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास सुमारे १५०० नागरिकांची लक्षणीय उपस्थिती लाभली होती. मंगलमय वातावरणात आणि वाद्यांच्या सुमधुर निनादात पार पडलेल्या या सोहळ्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.कार्यक्रमास किशोर शेठ कालडा, ड. सतीशचंद्र सुद्रिक, दिलीप शेषराव



वाघ, सुमन देसाई, वैशाली सोनवणे, अनुश्री खांडेकर, सुरज कालडा, ड. इक्बाल खान आणि सुदाम संसारे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.
या भव्य सोहळ्याचे नियोजन संस्थापक अध्यक्ष सुदाम संसारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्षा विद्या ठाकुर-कुंजीर, सल्लागार डॉ. माधव वानखडे, कार्याध्यक्ष प्रा. संजय मोरे, सरचिटणीस भुषण सरदार व शंकरराव कन्हेरकर, संयोजक विशाल पवार व आकाश वाघमारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच स्वागत समितीतील राजनंदिनी अहिरे, कविता वडनेरकर, पायल राजगुरु, योगिता डांगळे, अनिता दिवे, मिनाक्षी अहिरे, कविता बावीस्कर, प्रियंका बागुल व संगिता शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. निवेदनाचे सूत्रसंचालन अश्विनी सांगळे व अश्विनी पुरी यांनी केले, तर प्रसिद्धी प्रमुख वजीर शेख, रामभाऊ आवारे व डॉ. शाम जाधव यांनी प्रसारमाध्यमांशी समन्वय साधला.कार्यक्रमाच्या शेवटी आयोजित लकी ड्रॉमध्ये १२ महिलांना पैठणी साड्या, तर १२ पुरुषांना पॅन्ट व शर्ट पीस भेट देण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याची नोंद 'लिम्का बुक'मध्ये करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती आयोजकांनी दिली.समारोप प्रसंगी प्रा. संजय मोरे व भुषण सरदार यांनी आभार मानले. त्यानंतर उपस्थितांनी पंचपक्वान्नांच्या भोजनाचा आस्वाद घेतला. भव्य, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने उपस्थितांवर विशेष छाप पाडली.

# आईच्या स्मृतीतून समाजसेवा; पुण्यस्मरणा निमित्त वृद्धाश्रमात भावपूर्ण भोजनदान



दैनिक वादळ वार्ता

**जिवती (प्रतिनिधी)–** मातृप्रेमाची जपणूक करत समाजाप्रती कर्तव्यभावना जिवंत ठेवणारा प्रेरणादायी उपक्रम जिवती येथे पाहायला मिळाला. येथील रूपाताई साईनाथ नगराळे यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या सुपुत्रांनी समाजोपयोगी कार्य राबवत देवाळा येथील 'डेबू सावली' वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांसाठी भोजनदानाचे आयोजन केले.६ मे रोजी शुभम साईनाथ नगराळे व प्रितम साईनाथ नगराळे यांनी आईच्या स्मृतीप्रित्यर्थ वृद्धाश्रमातील रहिवाशांना सन्मानपूर्वक व प्रेमाने भोजन वाढले. यापूर्वी दुपारी साडेबारा वाजता रूपाताई नगराळे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बुद्ध वंदनेने वातावरण अधिक भावपूर्ण झाले. उपस्थितांनी शांततेत स्मरण करत त्यांच्या कार्याची उजळणी केली.भोजनदानासोबतच वृद्धाश्रमासाठी पंखे व इतर आवश्यक साहित्य भेट स्वरूपात देण्यात आले. दुपारी ३ वाजेपर्यंत हा उपक्रम उत्साहात पार पडला.या प्रसंगी शुभम नगराळे, प्रितम नगराळे, वनश्री दुर्गे, राजश्री येसांबरे, प्रितम दुर्गे, अमित कठाने, नम्रता कठाने, नंदूजी कठाने, चारुलता कठाने, शिवाजी कासले (मामा) तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.आईच्या स्मृतीतून साकारलेला हा समाजाभिमुख उपक्रम उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला असून, मातृप्रेम आणि समाजसेवेचा सुंदर संगम घडवणारा आदर्श म्हणून याकडे पाहिले जात आहे.

# नागपूर रोड अपघातांचा थैमान

## आम आदमी पक्षाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन; वाहतूक निरीक्षक पाटील यांच्या बदलीची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शहरातील नागपूर रोडवर सातत्याने होत असलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाने पोलीस प्रशासनाला निवेदन देत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बुधवारी (दि. ०६ मे २०२५) सायंकाळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार यांच्या नेतृत्वाखाली नागपूर रोड परिसरातील रहिवासी आणि कार्यकर्त्यांनी पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांना लेखी निवेदन सादर केले.मागील एका महिन्यात वरोरा नाका ते लखमापूर दरम्यान पाच ते सात निष्पाप नागरिकांचा अपघातात मृत्यू झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. मंगळवारी याच रोडवर दोन स्वतंत्र अपघात घडून दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. यातील एक अपघात रामनगर पोलीस ठाण्यासमोर, तर दुसरा जनता कॉलेज चौकाजवळ (डॉमिनोज समोर) घडला असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
या वाढत्या अपघातांमागे रस्त्यांवरील अवैध पार्किंग,






वाहतूक पोलिसांची अपुरी तैनाती आणि प्रशासनाची निष्क्रियता ही प्रमुख कारणे असल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे. विशेष म्हणजे, या समस्येबाबत पंधरा दिवसांपूर्वी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक पाटील यांच्याकडे तक्रार करूनही हे माझ्या कार्यक्षेत्रात येत नाही असे सांगत त्यांनी जबाबदारी झटकली, असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांत दोन जणांचा मृत्यू झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पाटील मागील पाच वर्षांपासून याच पदावर कार्यरत असून परिस्थितीत कोणताही सुधार झालेला नाही, असेही नमूद करण्यात आले आहे.नागपूर रोडसह शहरातील प्रमुख रस्ते अवैध पार्किंगमुक्त करण्याची, सायंकाळच्या वेळी विशेष वाहतूक पथक तैनात करण्याची, प्रमुख चौकांमध्ये दोन्ही दिशांना वाहतूक पोलीस उभे करण्याची तसेच अवैध पार्किंग करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. याशिवाय एसटी बस व खाजगी ट्रॅव्हल्सना चौकात थांबण्यास मनाई करण्यासह मुख्य रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे आणि स्पीड सेन्सर बसवण्याचीही मागणी करण्यात आली आहे.जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार यांनी सांगितले की, पोलीस अधीक्षकांनी निवेदन स्वीकारले असून तातडीने ठोस उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. प्रशासनाने लवकरात लवकर कारवाई न केल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.
यावेळी प्रदेश सचिव सुनील मुसळे, शहराध्यक्ष योगेश गोखरे, शहर संघटन मंत्री संतोष बोपचे, जिल्हा पदाधिकारी विशाल बीरामवार, इम्रान शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार लोणावळा येथील अल्पवयीन अत्याचारग्रस्त मुलीच्या शिक्षणासाठी करणार मदत

## आज लोणावळा पवना डॅम अल्पवयीन अत्याचार प्रकरणी उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हेंनी घेतली प्रशासनाची बैठक

**दैनिक वादळ वार्ता**

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

मावळ तालुक्यातील जवन (पवना डॅम) येथे ऑगस्ट २०२४ मध्ये अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात दि. ५ मे रोजी गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत विधान परिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज लोणावळा येथे वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.बैठकीनंतर डॉ. गोऱ्हे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी सांगितले की, पीडित मुलीचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार सर्व मदत केली जाईल. शासनाच्या विविध योजनांचा लाभ तिला मिळवून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.

**पीडितेच्या सुरक्षेवर विशेष भर**

पोक्सो प्रकरणात पीडितेच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्याचे डॉ. गोऱ्हे म्हणाल्या. महिला दक्षता समितीसोबत अनौपचारिक महिला कोअर टीम तयार करावी, ज्यात महिला लोकप्रतिनिधींचा समावेश असेल. यामुळे महिलांवरील अत्याचारांची माहिती तातडीने मिळू शकेल, असे त्यांनी सांगितले.तसेच, या तालुक्यातील २५ हजार लाडक्या बहिणींना या टीममध्ये सामील करून त्यांना सुरक्षेच्या बाबतीत जबाबदारी देण्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. भरोसा सेल आणि वन स्टॉप क्रायसिस सेंटरने पीडित मुलीची भेट घेऊन तिच्या समुपदेशनाची व्यवस्था केली असल्याचेही त्यांनी नमूद केले.याखेरीज, बालसंगोपन योजनेचा लाभ पीडितेला द्यावा. समुपदेशन चडथ (मास्टर ऑफ सोशल वर्क) पदवीधर महिलांकडून करावे. आरोग्य, शिक्षण आणि स्वावलंबनासाठी विशेष उपाययोजना राबवाव्यात अशा सूचना अधिकाऱ्यांना डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या.

डॉ. गोऱ्हे यांनी यापूर्वी विसापूर येथील घटना व रस्त्यातून मुलीला उचलून नेण्याच्या प्रकरणाचा आढावा घेतला. या दोन्ही प्रकरणांमध्ये चार्जशीट दाखल झाले असून लवकरच कोर्टात खटला उभा राहणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली, असे त्यांनी सांगितले.या बैठकीला, प्रांताधिकारी सुरेंद्र नवले, तहसीलदार विक्रम देशमुख, पोलीस उपअधीक्षक गजानन टोम्पे, पोलीस निरीक्षक दिनेश तायडे, सहायक पोलीस निरीक्षक विजया म्हेत्रे, चाईल्ड डेव्हलपमेंट प्रोजेक्ट ऑफिसर नेहा ठाकूर, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी रोहिणी ढवळे आदी अधिकारी उपस्थित होते.



# लोहा तहसील कार्यालयात ग्राम महसूल अधिकारी संघटनेची पाणपोई सुरू

**दैनिक वादळ वार्ता**

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

** उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असताना सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी संघटना, तालुका शाखा लोहा यांच्या वतीने तहसील कार्यालय परिसरात पाणपोई उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

तहसील कार्यालयात विविध कामांसाठी दररोज मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमामुळे तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळत असून नागरिकांकडूनही या उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.




यावेळी ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे उपविभागीय अध्यक्ष निळकंठ पांडागळे, तालुका अध्यक्ष भुमेश्वर विभूते, मंडळ अधिकारी सुगावे, संतोषकुमार जाधव, मोतीराम पवार, नारायण गाढे, नितीन रायाजी, मृगेश नाडार आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर अशा समाजोपयोगी उपक्रमांची गरज अधोरेखित केली. भविष्यातही नागरिकहिताचे विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. ग्राम महसूल अधिकारी संघटनेच्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# डॉ.सौ.प्रतिभाताई थोरात यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केल्याबद्दल केज येथे सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

केज येथील सामाजिक कार्यकर्त्या आणि वैद्यकीय क्षेत्रातील सर्व परिचित नाव डॉ.सौ. प्रतिभाताई अशोकराव थोरात यांनी नुकताच शिवसेना पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांच्या या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी माजी उप सभापती सौ.सरोजनीताई दादासाहेब ससाणे यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

पक्ष संघटना अधिक मजबूत होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी बोलताना सौ.सरोजनी ताई ससाणे म्हणाल्या की,डॉ.सौ.प्रतिभाताई यांच्यासारख्या सुशिक्षित आणि जनसंपर्क असलेल्या महिला नेतृत्वा मुळे केज विधानसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद निश्चितपणे



वाढणार आहे.सर्व सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी त्या भविष्यातही आक्रमक पणे काम करतील,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.या सत्कार सोहळ्याप्रसंगी सौ.सरोजनीताई ससाणे, दादासाहेब ससाणे केज विधानसभा प्रमुख,तथा माजी संचालक,कृषी उत्पन्न बाजार समिती केज यांच्यासह शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी,कार्यकर्ते आणि महिला आघाडी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनसेवेचा संकल्प करत

सत्काराला उत्तर देताना डॉ.सौ.प्रतिभाताई थोरात यांनी पक्षप्रमुख आणि स्थानिक नेतृत्वाचे आभार मानले.शिवसेनेच्या माध्यमातून तळागाळा तील लोकांपर्यंत पोहोचून शासकीय योजनांचा लाभ गरजूंपर्यंत मिळवून देणे आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी आपण कटिबद्ध राहू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

# रांजणी येथील इकरा उर्दू हायस्कूलची उज्वल निकालाची परंपरा कायम, दहावीचा निकाल ९५ टक्के



**दैनिक वादळ वार्ता**

**जालना । असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील इकरा उर्दू हायस्कूलने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली असून शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल ९५.८५ टक्के लागला. या शाळेचे ४६ पैकी ४४ विद्यार्थी दहावीच्या परिक्षेत उत्तीर्ण झाले.रांजणी येथील इकरा उर्दू हायस्कूलचा दहावीचा निकाल दरवर्षी ९५ टक्के पेक्षा जास्त लागतो. यावर्षी देखील शाळेने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली. या परीक्षेत अक्सा निसार शेख हिने ८६.६० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला. ज़ारा कशफ फ़िरोज़ शेख हिने ७९.८० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच फ़ातेमा असलम कुरेशी हिने ७८.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक ख़ालीद मोहसीन, शिक्षक सय्यद तौहिद, शेख अब्दुल रहीम, मिर्झा फ़रहत बेग, शेख फ़हीम आदींनी अभिनंदन केले.

# केकतसारणी येथे राष्ट्रचिंतन अभियान उत्साहात संपन्न

## कृषी,आरोग्य आणि शिक्षण विषयावर सखोल मार्गदर्शन

**लोकसहभाग आणि आभार**

**केकतसारणी गावासह आजूबाजूच्या गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल आणि गावकऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल सौ. राधाताई सपकाळ यांनी सर्व ग्रामस्थांचे व परिसरातील नागरिकांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत.आभार प्रदर्शनाने कार्यक्रमांची सांगता झाली.**



**दैनिक वादळ वार्ता**

**केज । प्रतिनिधी**

हिंदराष्ट्र ऑर्गनायझेशन संस्थेच्या वतीने राष्ट्रचिंतन अभियान अंतर्गत केकतसारणी येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याकार्यक्रमात कृषी, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली असून, यामाध्यमातून ग्रामस्थांना नवी प्रेरणा मिळाल्याची माहिती हिंदराष्ट्र संघाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा सौ.राधाताई सपकाळ यांनी दिली.या कार्यक्रमा साठी मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ.अशोक थोरात यांनी भूषविले.कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून महर्षी गज अरविंदजी उपस्थित होते.त्यांच्या मार्गदर्शनाने उपस्थित जनसमुदाय प्रभावित झाला.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खालील मान्यवर उपस्थित होते.

दादासाहेब ससाने शिवसेना विधानसभा प्रमुख,पृथ्वीराज (अण्णासाहेब) पाटील शिवसेना तालुकाप्रमुख, नसरीन बागवान राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हाध्यक्षा,जीवन थोरात,रामदास सपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते.कृषी,आरोग्य, शिक्षण या तीन प्रमुख विषयांवर मंथन करण्यात आले. कार्यक्रमाचा मुख्य केंद्रबिंदू कृषी,आरोग्य आणि शिक्षण हे तीन विषय होते.चर्चासत्राच्या माध्यमातून उपस्थित नागरिकांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.ग्रामीण भागातील विकासासाठी हे तिन्ही घटक अत्यंत महत्त्वाचे असून,त्यावर तज्ञांनी केलेले मार्गदर्शन भविष्यात दिशादर्शक ठरेल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.या कार्यक्रमाच्यामाध्यमातून अनेक लोकांचे प्रश्न सुटले असून त्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे.कृषी, शिक्षण आणि आरोग्य या विषयांवरील सखोल मार्गदर्शनाचा लाभ सर्वांना झाला आहे असे सौ.राधाताई सपकाळ प्रदेश उपाध्यक्षा,हिंदराष्ट्र संघ यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# लग्नसराईची धूमधाम अन् वऱ्हाडी मंडळी घामाघूम

**दारू असेल तर नाचू**

**सध्या लग्नसराईचा जोर पक्का वाढल्याचे दिसत असतांना दिवसाकाठी एका गावात दोन ते तीन विवाह होत असल्याचे दिसत आहेत.या विवाहांमध्ये वर पक्षा कडून वधू पक्षाला दारुच्या स्वरूपात पात देण्याची पद्धत आहे.म्हणून तरुण मंडळी नाचण्याकरीता दारू असेल तरच नाचू असा हट्ट वराकडील मित्रमंडळी करत असल्याचे दिसत आहेत.**



**दैनिक वादळ वार्ता**

**रविंद्र वळवी । मोलगी**

सातपुडा परिसरात दर वर्षी एप्रिल महिना हा उत्तरकार्या साठी राखीव तारखा प्रमाणे घेऊन आदिवासी बांधवांचे पारंपरिक तुर (मांदल) वाद्याच्या आवाजाने पूर्ण एप्रिल महिना दुमदुमत असतो तर मे महिन्यात सध्या लग्नसराईचा धुमधडाका सुरू झाल्याचे पाहण्यास मिळत आहे. मात्र,सध्या वाढत्या तापमानामुळे व-हाडी मंडळींना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे.

उन्हाचा पारा जोमाने वाढत असून उन्हातान्हातून विवाहासाठी वऱ्हाडी मंडळी घामाघूम होत असल्याचे दिसत आहे.सध्या लग्नतिथी खूप मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे एप्रिल महिन्याच्या शेवटी व मे महिन्यात काही लग्न तिथी असून लग्नसराईला चांगलाच वेग आल्याचे दिसत आहे. लोकसंख्येचाअंदाज घेता प्रत्येकाला लग्नासाठी एक दिवस भेटत नसल्याने सध्या एका गावात दिवसा काठी दोन ते तीन विवाह होत आहेत या विवाहासाठी पाणी आणण्या करीता वर वधू कडील मंडळींची चांगलीच धावपळ होत आहे. काही मंडळीं कडील वधू पित्याला पाणी विकत घ्यावे लागत आहे.मे महिन्यात लग्नतिथी असल्याने वधू-वराकडील मंडळी वधू-वरांसाठी बाजारपेठेत कपडे, भांडे व सोने खरेदी करण्याकरीता मोठी गर्दी करीत असल्याने कपड्याचे,भांड्याचे व सोन्याचे दुकाने हाऊसफुल झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहेत.मात्र, वाढत्या तापमानामुळे वऱ्हाडी मंडळीची दमछाक देखील होत असल्याचे दिसत आहे.

**डी.जे.ने हरपला बँडबाजा**

**लग्नसराई म्हटलं की जिथ तिथं सनई, चौघडा त्यानंतर बँडबाजा, तडमताशा, ढोलीबाजा आदी वाद्यांची धूम.परंतु,सध्या या सर्व वाद्यावर डी.जे.ने कुरघोडी केल्याचे चित्र दिसत आहे.जिथे डि.जे.नसतो तिथे मात्र आदिवासींचे ढोल वाद्य आपले स्थान टिकवून आहे.परंतु, ढोलीबाजा पेक्षाही डी.जे.च्याच तालावर नाचण्यासाठी आजची पिढी जास्त भर देत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पूर्वी हळद लावल्यानंतर ते वऱ्हाडाच्या जाण्यापर्यंत सनईचा सूर ऐकावयास मिळत होता. त्यानंतर बँडने ती जागा घेतली. त्यानंतर ढोलीबाजाने त्याची जागा घेतली आणि आता ती जागा डी.जे. घेऊ लागला आहे.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077